




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४ | अंक ३०६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# डुप्लिकेट नेता म्हणत मनोज जरांगेंचा महायुतीतील बड्या नेत्यावर निशाणा

### फडणवीसांवर टीका

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही मनोज जरांगेंनी टीका केली आहे. त्याला काय कळत हेंद्रा आहे तो.... त्याने मराठ्यांचा खेळ संपवला आहे. काय नेरेटिव्ह त्याने सेट केला? आमच्या लोकांना पंधराशे रुपये देतो आणि त्यांना आयुष्यभराच आरक्षण देणार हे योग्य नाही. अशाच आमच्या समस्या असल्यानंतर आम्ही सण उत्सव कसे साजरे करणार? फडणवीस यांनी मराठ्यांवर काही उपकार केले आहेत का? उघड्या डोळ्यांनी तुम्ही मराठ्यांचा घात केला. जातवान मराठे तुमचा भुगा करणार अशा शब्दात मनोज जरांगे यांनी फडणवीसांवर निशाणा साधला आहे. महाराष्ट्रातील 15 जातींची ओबीसींच्या यादीत समावेश झाला आहे. 5 जातीच्या नागरिकांची लोकसंख्या ही तब्बल 10 लाख इतकी आहे. यावर मनोज जरांगेंनी भाष्य केलं. आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्यावर टीका केली आहे. हे भाजपचे पांचट मोचक आहेत. यांनीच या जाती ओबीसीत घेतल्या आहेत. ओबीसीत घेतलेल्या जाती गिरीश महाजन यांच्या जातीच्या उपजाती आहेत, असं म्हणत मनोज जरांगेंनी गिरीश महाजन यांच्यावर टीका केली आहे.



### निवडणुकीवर भाष्य

सगळीकडे मराठ्यांचं मतदान आहे. प्रत्येक मतदार संघात एकेक लाख मतदान आहे. यांना आधी हिंदुत्व म्हणण्याची सवय आहे. आता हिंदू संघटनांसमोर पेच आहे की हे आहे कुणाचे? हरियाणा आणि महाराष्ट्राचं गणित जुळणार नाही. आचारसंहिता लागण्याआधी मराठ्यांनाआरक्षण द्या. तुम्ही फक्त आचारसंहिता लावा मग तुम्हाला कचका दाखवतो.तुमचे सगळे पाडतो. इथे नेता कार्यकर्ता समाज संपत नाही. तुमचे सगळे पाडतो, असं म्हणत जरांगेंनी आगामी निवडणुकीवर भाष्य केलं आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यात आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी मनोज जरांगे यांनी नाव न घेता छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. आता मराठ्यांच्या बाबतीत सरकारचे डोळे गेले आहेत. आता ओबीसी नेते कुठे झोपले आहेत. येवल्याचा डुप्लिकेट नेता आता कुठे गेला आहे? आता या जातींना विरोध का नाही?, अशा शब्दात मनोज जरांगेंनी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. मराठे आता शहाणे होतील. मराठ्यांचे डोळे उघडणे गरजेचं होतं. सरकारने या जातींना ओबीसीत घेताना महाविकास आघाडीकडून लिहून घेतलं आहे का? हे एकमेकांना लिफ्ट देत आहेत. मराठ्यांना आरक्षण देताना यांना त्रास होतो. एवढा जातीयवाद कशासाठी?, असंही मनोज जरांगे म्हणालेत.



## डॉ,शिवाजी राऊत , यांनी आष्टी विधानसभा निवडणुकीत उतरावे अशी कार्यकर्त्यांची मागणी, आष्टी विधानसभा मतदारसंघातील धनगर समाजाची बैठक संपन्न,

### शिवाजी राऊत यांचा आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये दांडगा जनसंपर्क ,लक्ष्मण मस्के

**दैनिक लोकआरंभ//**
बीड प्रतिनिधी ,बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये डॉ, शिवाजी राऊत यांचा खूप मोठ्या प्रमाणात दांडगा जनसंपर्क आहे त्या अनुषंगाने त्यांनी बैठक बोलावली होती, या बैठकीमध्ये सर्वांनी आपली भूमिका जाहीर केली, यावेळी सर्व कार्यकर्त्यांची मागणी अशी होती की डॉ, शिवाजीराव राऊत यांनी आष्टी विधानसभा निवडणूक लढवावी, अशी मागणी कार्यकर्त्यांची होती, या बैठकी ला प्रमूख मार्गदर्शक डॉ शिवाजी काका राऊत. प्रमुख अतिथी. सुरेश जी काळे. मा सभापती देवीदास शेंडगे.डॉ भास्कर सुस्लादे.अंगदजी भोंडवे.गणेश पाटील कोळेकर. जनहित लक्ष्मण मस्के, बाबासाहेब लंबाटे. तसेच पाटोदा तालुक्यातील धनगर समाजाचे दिग्गज नेते मंडळी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संयोजक म्हणून सामाजिक कार्यकर्ते मा सुनील काळे हे होते. डॉ शिवाजी काका राऊत यांनी आष्टी विधानसभा निवडणुकीत उतरावे आणि एक ईतिहास घडवावा त्यासाठी आम्ही सर्वांना सोबत घेऊन तन मन धनाने सर्वत्परी मदत करू. गेल्या 30 वर्षात बीड जिल्ह्यात धनगर बांधवांची राजकीय क्षेत्रात मोठी धोबीपछाड होत आहे. ज्यांना सहकार्य करतोय आपण .ते नंतर कोणी पण समाजाला विचारत नाहीत.त्यामुळेआपलाच दांडा आणी आपलाच झेंडा आता कायम करावयाचा आहे.धनगर मतांचा खुंटा हा जोरदार पणे ठोकून देयाचा आहे. आणि येणाऱ्या काळामध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघावर एक नवा इतिहास घडवायचा आहे

## श्री क्षेत्र नारायण गड येथे होणाऱ्या भव्य दसरा मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, संजय बहिर



बीड प्रतिनिधी .
श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील व नारायणगडचे मठधिपती ह, भ, प, शिवाजी महाराज यांच्या उपस्थित, दिनांक 12 ,10.2024.वार शनिवारी दुपारी 12,वाजता होनार आहे,या यावेळी महाराष्ट्र राज्यातील खूप मोठ्या प्रमाणात समाज बांधव येणार आहे, या दसरा मेळाव्याला लाखोच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान मराठा सेवक संजय बहिर यांनी केले आहे,



## बीड मधील औद्योगिक विकासासाठी उद्योजकांचे राज्यपालांना साकडे

### बीड मधील व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाशी राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी साधला संवाद

बीड: प्रतिनिधी राज्यपाल सीपी राधाकृष्णन हे बीड जिल्हा दौऱ्यावर असताना त्यांनी बीड येथील बीड जिल्हा व्यापारी महासंघ व उद्योजकांशी चर्चा केली यावेळी बीडमध्ये औद्योगिक विकासासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी व्यापारी व उद्योजकांच्या शिष्टमंडळाने राज्यपालांकडे केली.
बीड येथे अतिरिक्त औद्योगिक वसाहत उभी करावी, औद्योगिक वसाहतीसाठी माजलगाव बॅक वॉटर योजनेतून पुरेसे पाणी उपलब्ध करावे, उद्योजकांना वीजबिलात लागणारे डिमांड चार्जेस कमी करावेत, साखर उद्योगांना जसे अडचणीत असताना पॅकेज मिळते त्याच प्रमाणे जीनिंग व ऑईल मिल व्यवसायाला पॅकेज देण्यात यावे तसेच GST भरत असताना पण विनाकारण व्यापाऱ्यांना लागणारा व्यवसाय कर रद्द करावा अशा मागण्या व्यापारी व उद्योजकांच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्यासमोर मांडल्या यावेळी राधाकृष्णन यांनी या प्रश्नावर अधिक माहिती देखील जाणून घेतली. यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष तथा उद्योजक अशोक शेटे,



बीड जिल्हा जिनिंग प्रेसिंग चे अध्यक्ष अमृतलाल सारडा सचिव भानुदास जाधव, ऑईल मिल असो.अध्यक्ष राजीव संचेती यांच्यासह उद्योजक माधव निर्मळ ,मनोज दुग्गड,अभिषेक चरखा,रवींद्र दुग्गड,संतोष उपरे,दीपक सोनी आदी उद्योजक व व्यापारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# बीड विधानसभा मतदारसंघात अडीच हजार घरकुलांना मंजुरी

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले पालकमंत्री ना.धनंजय मुंडेंचे आभार

बीड (प्रतिनिधी) दि.१० : राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड विधानसभा मतदारसंघातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांसाठी तब्बल अडीच हजार घरकुलांना राज्य शासनाने बुधवारी (दि.९) मंजुरी दिली. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या आग्रही मागणीमुळे विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी हा निर्णय घेतला. त्याबद्दल दोघांचेही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत





योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यातून १५०० तर शिरूर कासार तालुक्यातून १००० हून अधिक अशा एकूण २ हजार ५०० घरकुलांचा समावेश आहे. या सर्व लाभार्थ्यांना योजनेतून स्वतः:चे पक्के घर बांधण्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार रुपये निधी मिळणार आहे. यापूर्वी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील अनेक सरपंचांनी हजारो घरकुलाचे प्रस्ताव पंचायत समितीमार्फत दाखल केले होते. त्यातून जिल्हास्तरीय समितीने पात्र प्रस्ताव शासनाकडे पाठविले. परंतु अनेक महिन्यांपासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने सरपंचांकडून सातत्याने मंजुरीची मागणी होत होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी रेकॉर्डब्रेक २८ हजार घरकुलांना मंजुरी दिली. यात बीड विधानसभा मतदारसंघातील तब्बल अडीच हजार घरकुलांचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### पालकमंत्र्यांना भेटून सरपंच आभार मानणार

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातून घरकुलांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होते. परंतु अनेक हेलपाटे मारून मंजुरी मिळत नव्हती. अखेर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी घरकुलांचा प्रश्न मार्गी लावला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अनेक सरपंच हे ना.मुंडे यांची भेट घेऊन आभार मानणार असल्याचे सांगितले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# पत्रकार देखील माणूसच !

पत्रकार हा समाजाचा चौथा स्तंभ. पत्रकार म्हणजे चौकस व अभ्यासू प्रवृत्तीचा निष्पक्षपाती प्रतिभावंत निर्भिड माणूस यासह अनेक गुळगुळीत शब्दात संपादक, पत्रकारांविषयी ब-याच वेळा स्तुतीसुमनांचा वर्षावही केला जातो. ठराविक वृतपत्रे सोडली तर बाकी वृत्तपत्रे आपल्या पत्रकारांना मानधन देत नाहीत, उलट त्याच्यांकडे सातत्याने जाहिरातींचा तगादा लावला जातो. काही संपादकांना तर वर्तमानपत्राच्या डीटीपीपासून छपाई व वितरणासह खूप अडचणींतून अंक काढावे लागवे लागतात. वर्तमानपत्र, साप्ताहिक, मासिक, तैमासिक वा पाक्षिक अंक हे मिळणाऱ्या जाहिरातींवरच अवलंबून असतात. परंतु अलिकडे जाहिराती मिळणे देखील कठीण झाले आहे.

पत्रकार दिनानिमित्त काही जाणकार समाज बांधवांकडून संपादक, पत्रकारांचा सन्मान सत्कार सुध्दा केला जातो. अर्थात समाजातील अनेक कर्तृत्ववान घटकांचा विशेष दिवशी आपण सन्मान करीत असतो. पत्रकार हा समाजाचा महत्त्वाचा घटक असून पत्रकारांचा यथोचित सन्मान केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या पत्रकाराने दिलेल्या बातमीचे गांभिर्य लक्षात न घेता त्याला धमावणे, शिवराळ भाषेचा वापर करणे, मारहाण करणे देखील चुकीचे आहे. कारण पत्रकार हा सुध्दा माणूसच आहे. शासनाने देखील पत्रकारांचे गाऱ्हाणे ऐकून घेणे गरजेचे आहे.

खरंतर सत्ता परिवर्तन घडवून आणण्याची पत्रकारांच्या लेखणीमध्ये क्षमता आहे हे देखील सत्ताधा-यांसह राजकीय पंडितांनी विसरता कामा नये. पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आज गरजेचे आहे. पत्रकारांच्या मागण्या व समस्यांबाबत केवळ अधिस्विकृत पत्रकारांचा विचार न करता शासनाकडून मिळणाऱ्या सवलतींचा सरसकट पत्रकारांना लाभ व्हायला हवा. त्यांच्या समस्या शासन दरबारी पोहचाव्यात या हेतून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय २८ जुलै ते २० ऑगस्ट या दरम्यान 'पत्रकार संवाद यात्रा' काढली. या संवाद यात्रेत महाराष्ट्रातून हजारों पत्रकार सहभागी झालेत. पत्रकार संवाद यात्रेचा समारोप २० ऑगस्ट रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात संपन्न झाला. यावेळी मुंबईचे पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच आमदार पंकजा मुंडे उपस्थित होते. पत्रकारांच्या मागण्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पर्यंत पोहचवून आठ-दहा दिवसात याविषयावर निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री मंगलप्रभात लोढा व चंद्रकांत पाटील यांनी दिले.

पाचोरा येथील पत्रकार संदिप महाजन यांना गेल्यावर्षी ९ ऑगस्ट रोजी दुपारी नगरपालिकेसमोर तोंडावर रुमाल टाकून त्यांना खाली पाडून काही अज्ञात व्यक्तींनी मारहाण केल्याची घटना घडली. अशा भ्याड हल्ल्याचा निषेध करावा तेवढा कमीच असतो.

आपल्या आजूबाजूला जेव्हा एखादी चांगली-वाईट तसेच वेगळी घटना घडते तेव्हा आपल्याला प्रथम पत्रकारांचे स्मरण होत असते. कारण पत्रकार समाजाचा आरसा असतो. समाजातील प्रत्येक घडामोडींकडे त्याचे बारकाईने लक्ष असते. समाजाला त्याच्याकडून खूप आशा-अपेक्षा असतात. पण तो देखील माणूसच असतो ना! त्यालाही संसार प्रपंच असतो, त्याचबरोबर उदरनिर्वाहकरीता, पोटाची खडगी भरण्यासाठी त्यालाही धडपड करावी लागत असते. उत्तम पत्रकारितेसाठी पत्रकाराकडे शब्द भांडारासह संबंधित विषयाचे ज्ञान, कौशल्य, समयसुचकता व संवादकौशल्य असणे जसे महत्त्वाचे असते तसेच सामाजिक मूल्ये नियम व निर्बंध याबाबतची जाण असणेही तेवढेच जरुरीचे असते.

ब-याच पत्रकारांची उत्तम पत्रकार म्हणून गणना केली जाते. तर काही जण आपल्या पत्रकारितेचा नुसता टेंभा-देखावा मिरवीत असतात. काही फक्त गाडीवर PRESS लिहून आपला खोटारडा मुखवटा धारण करीत असतात. काही इतरांना ब्लँकमेल करुन चिरीमिरी मिळविण्यात मग्न असतात. अशा चिरीमिरीवाल्या पत्रकारांमुळे पत्रकारिता बदनाम होत असते.

मला देखील स्वतःला एक अनुभव असा आला होता कि १८ वर्षांपूर्वी ज्यावेळी माझ्या वडिलांचे हृदयविकाराने निधन झाले होते. वडिलांची निधनवार्ता घेण्याकरीता [ मी ज्या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम करीत होतो त्या वृत्तपत्राचा एक ज्येष्ठ पत्रकार मित्र ] माझ्या घरी आला, माझ्याकडून निधनवार्ता घेऊन वडिलांचा पासपोर्ट घेतल्यानंतर त्याने माझ्याकडे पन्नास रुपयांची मागणी केली असता, माझ्याकडे आता पन्नास रुपये नसल्याचे तेव्हा मी त्याला सांगितले. मी देखील एक पत्रकार. माझ्याच सोबत एका वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम करणारा ज्येष्ठ मित्र माझ्याचकडून ते ही निधनवार्तासाठी पैशांची मागणी करतोय ! अंर्तमनातून त्याच्याविषयी फार चीड आली. अर्थात मला काय करायचे ते नंतर मी केले अन् १५/२० दिवसानंतर त्या मित्राला वृत्तपत्राकडून स्मितभाषेत प्रेमपत्र येऊन सन्मानपूर्वक सदर वृत्तपत्रातून हटविण्यात आले. पत्रकारीतेला कलंक लावणारे देखील अनेक चांडाळचौकडी सातत्याने मधूरभाषेतून अथवा ब्लँकमेल करुन पैशांची किंवा पार्टीची मागणी करण्याचे उद्योग करीत असतात. अथवा आपले काम त्यांच्याकडून करवून घेत असतात. अशा कलंकीत ना लायक पत्रकारांपासून दूर राहिलेले केव्हाही बरे !

अशा पत्रकारांची लेखणी कधी बोलताना जाणवत नाही की तसे त्यांचे व्यक्तिमत्व दृष्टीस पडतही नाही. अर्थात ही मंडळी सुमधूर भाषेचा वा दादागिरीचा वापर करुन आपला उल्लू साध्य करण्यात कधीकधी यशस्वी सुध्दा होतात. परंतु चांगल्या व्यक्तीच्या यादीतून यांचे नाव कधीच कट झालेले असते. प्रत्येक क्षेत्रात निस्वार्थीपणे आपल्या कार्याचा उत्तम ठसा तयार करुन आपली विशेष ओळख ठराविकच निर्माण करतात.

# छत्रपती संभाजीनगर येथील बुद्धभुमी बचाव आंदोलनाच्या समर्थनार्थ लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलनः- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक लोकआरंभ//**

बीड:- (दि.१० )मराठवाड्यातील बौद्धांचे श्रद्धास्थळ म्हणून छत्रपती संभाजीनगर शहरातील बुद्ध लेखणीच्या पायथ्याशी असलेल्या विपश्यना विहार,मेडिटेशन सेंटरला अतिक्रमण समजुन नोटीस बजावण्यात आली असुन यामुळे बौद्ध समाजाच्या भावना जाणिवपूर्वक दुखावण्याचे षडयंत्र असुन याच्या निषेधार्थ आणि बीड येथील नियोजित रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नाव द्यावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे समितीच्या वतीने दि.०९ बुधवार रोजी आयोजित मोर्चाला पोलिस प्रशासनाने परवानगी नाकारली यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१०. वार गुरूवार रोजी सकाळी ११ वाजता अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान शिवतीर्थ लिंबागणेश येथे " बुद्ध भुमी बचाव आंदोलन" समर्थनार्थ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. "युद्ध नको बुद्ध हवा " " बौद्ध भुमी आमच्या हक्काची" आदि घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच बाळासाहेब मोरे पाटील, ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनावणे यांची समायोजित भाषणे झाली.आंदोलनात



सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ गिरे, विक्रांत वाणी, अशोक जाधव,संतोष वाणी,बाळकृष्ण थोरात ,सुरेश निर्मळ,रेवण येडे,बबलु थोरात,विशाल सोनावणे, आनंद येडे, विशाल येडे, सुर्यकांत ठोकळ, अनिल शेलार आरूण निर्मळ, जितु निर्मळ, रोहित सोनावणे, दिनेश जाधव,शंकर निर्मळ, अमोल वक्ते, पप्पू निर्मळ, आदी आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते.निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे, संतोष राऊत , रामहरी शिंदे,तलाठी गणपत पोतदार यांना देण्यात आले.

बुद्ध लेखणीच्या पायथ्याशी असलेल्या विपश्यना विहार,मेडिटेशन सेंटरला अतिक्रमण घोषित प्रकरणात सखोल चौकशी करून कारवाई करा

मराठवाड्यातील बौद्धांचे श्रद्धास्थळ म्हणून छत्रपती संभाजीनगर शहरातील बुद्ध लेखणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार,मेडिटेशन सेंटरला गेल्या ६०- ७० वर्षांपासून दरवर्षी जवळपास १० लाख उपासक,उपासिका तसेच अभ्यासक,पर्यटक भेट देतात.मात्र या श्रद्धास्थळाला अतिक्रमण समजुन नोटीस बजावण्यात आली असुन यामुळे बौद्ध समाजात संतापाची लाट उसळली असून यामुळे बौद्ध समाजाच्या भावना जाणिवपूर्वक दुखावण्याचे षडयंत्र असुन मुळातच हजारो वर्षांपासून बौद्ध लेणी अस्तित्वात असताना त्यांच्या पायथ्याची जागा विद्यापीठाची कशी असेल असा प्रश्न उपस्थित होत असताना कोणतीही शहानिशा न करता बौद्धांच्या ऐतिहासिक स्थळाला हटविण्याचा मनुवादी सरकारचा डाव असुन हाणुन पाडण्यासाठी बौद्ध लेणी बचाव,बुद्धभुमी बचाव म्हणत अस्मितेचा लढा लढण्यासाठी आणि शासनाच्या निषेधार्थ संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी. बुद्ध लेणीच्या पायथ्याशी पायाभूत सुविधांसाठी ५० एक्कर जागा द्यावी. बुद्धिष्ट सर्किट मध्ये या वास्तुचा समावेश करावा, पर्यटन स्थळ व तिर्थक्षेत्राच्या यादीत समावेश करावा, अजिंठा लेणीच्या धर्तीवर प्रकाशयोजना करावी,लेणीच्या डोंगराच्या संवर्धनासाठी विशेष निधीची तरतूद करावी,अजिंठा लेणी मार्गावरील हर्सुल टी पॉइंट येथे भव्य बुद्ध मूर्ती बसविण्यात यावी.आजिंठा लेणी मार्गाचे रखडलेले काम युद्धपातळीवर पुर्ण करावे.

## राज्यपालांच्या नावाचा वापर करून आंबेडकरी समुदायाचा नियोजित मोर्चाला परवानगी नाकरणे निषेधार्ह :- डॉ.गणेश ढवळे

बीड येथील नियोजित रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नाव द्यावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे समिती व आंबेडकरी जनतेकडून काल दि.०९.१०.२०२४ वार बुधवार रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.त्यासाठी जिल्ह्यातील विविध भागातील समाज बांधव बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ दाखल झाले होते.यावेळी पोलिसांनी मोर्चा काढण्यास राज्यपालांच्या दौऱ्याचे कारण पुढे करत परवानगी नाकारली. राज्यपालांचा दौरा केवळ २ तास होता त्यामुळे पोलिस प्रशासनाने काही मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले नाहीत याबद्दल आंबेडकर अनुयायांनी नाराजी व्यक्त केली याचा डॉ . गणेश ढवळे यांनी तिव्र निषेध व्यक्त केला.

# गेवराई विधानसभा निवडणूक लढवणार, प्रा, अण्णासाहेब मतकर, बीड जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मेतदारसंघ राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढवणार,



बीड प्रतिनिधी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर साहेब यांच्या आदेशाने व श्री काशिनाथ नाना शेवते प्रदेशाध्यक्ष श्री माऊली नाना सलगर मुख्य महासचिव श्री शिवाजी शेंडगे राज्य सचिव श्री विष्णू गोरे मराठवाडा अध्यक्ष श्री आश्रुबा कोळेकर मराठवाडा संपर्कप्रमुख श्री महेश चौरे, जिल्हा संपर्कप्रमुख आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती तसेच महाविकास आघाडीकडून जोरदार तयारी सुरू असून महायुतीचा घटक पक्ष असलेला राष्ट्रीय समाज पक्ष 288 विधानसभा मतदारसंघात स्वतंत्र उमेदवार उभे करनार आहेत,मध्ये बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघ राष्ट्रीय समाज पक्ष लढवणार व त्यामध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघ राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा, अण्णासाहेब मतकर हे निवडणूक लढवणार आहेत, त्यामुळे आपल्या विधानसभेत बूथ प्रमुख सर्कल प्रमुख गणप्रमुख निवड करणे व शाखा नियोजन तसेच इतर नवीन कार्यक्रम

तसेच आपल्या तालुक्यात पक्षाचे काम वाढवण्यात यावे. राष्ट्रीय समाज पक्षाचे व महादेव जानकर साहेबांचे हात बळकट करा. शेतकऱ्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी किंवा इतर शासकीय योजनेसाठी जनहितासाठी मोर्चे आंदोलन निवेदन यासारखे नियोजन करण्यात यावे ,व राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर सर्वांच्या सुखदुःखात, मदतीला धावून जाणारे व्यक्तीमत्त्व,आहेत, सर्वांना आपल्या पदाच्या माध्यमातून न्याय देणारे , गेवराई विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने यावेळेस एक शेतकऱ्याचा मुलगा निवडणूक लढवणार आहेत, यावेळी जिल्ह्यातील राष्ट्रीय समाज पक्षाची टीम कामाला लागली आहे .यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष गेवराई विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे, जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय समाज पक्षाची टीम आता कामाला लागली आहे, यावेळी गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये राजकीय वातावरण बदलू शकत

# केज तालुक्यातील रस्त्याच्या कामाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

## दूरदृष्य प्रणालीव्दारे 11 ऑक्टोबर रोजी भूमीपुजन

बीड, दि, 10:- सार्वजनिक बांधकाम विभाग आणि आशियाई विकास बँक अर्थ सहाय्यित प्रकल्प टप्पा-3 अंतर्गत केज तालुक्यातील खर्डा-चौसाळा-साळेगांव-माळेगांव-बोरीसावरगांव-लोखंडी सावरगांव (भाग – माळेगाव ते लोखंडी सावरगाव) या रस्त्याच्या कामाचे भूमीपुजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीव्दारे शुक्रवार दि. 11 ऑक्टोबर, 2024 रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत.

अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगांव जंक्शन (बीड रोड) येथे मुख्य कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम वगळुन) मंत्री रविंद्र चव्हाण, कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग सोनवणे, विधान परिषद आमदार पंकजा मुंडे, विक्रम काळे, सतिष चव्हाण, विधानसभा आमदार प्रकाश सोळंके, लक्ष्मण पवार, बाळासाहेब आजबे, संदीप क्षीरसागर, नमिता मुंदडा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य अभियंता तथा प्रकल्प संचालक (बासप्र) (सार्वजनिक बांधकाम विभाग कोकण, मुंबई) शरद राजभोज, धाराशिव मंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग अधिक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, अंबाजोगाई कार्यकारी अभियंता (सा.बां.) गौरीशंकर स्वामी, केज उपविभागीय अभियंता (सा. बां.) युवराज मळेकर यांनी केले आहे.

# माजी जि. प अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

## भावी आमदार म्हणून कार्यकर्त्यांच्या घोषणा

*पाटोदा प्रतिनिधी: पाटोदा तालुका येथे धनगर बांधवांची विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर एक समाजाची दश्या व दिशा ठरवण्यासाठी व्यापक स्वरूपात बैठक ठेवण्यात आली होती. या बैठकीत तालुक्यातील धनगर समाजाचे सरपंच, उपसरपंच, सदस्य ,चेअरमन आणि जागृत लोकप्रतिनिधी ,पत्रकार,आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. झालेल्या बैठकीत धनगर समाज बांधवांनी मोठा आक्रोश निर्माण केला. गेले तीस वर्षापासून मतदारसंघात ओबीसीच्या नावाखाली धनगर समाजाच्या मतांचा वापर करून घेत असल्याचं कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केलं. राजकीय सत्तेपासून जाणून बुजून दूर ठेवल्याचाही आरोप यावेळी कार्यकर्त्याकडून करण्यात आला. त्यामुळे आता कोणाच्याही



गुलामगिरी मध्ये न आडकता एक स्वतंत्र भूमिकेत संघर्ष करावा आणि आपले अस्तित्व निर्माण करावे.

गेल्या अनेक वर्षात इतरांना निवडून दिले की, ना धनगर नेत्यांना किंमत, ना धनगर बांधवांना. सगळी गम्मत होउन बसली आसल्याने आत्ता धनगर समाजाच्या नेत्याने पुढे येऊन येणाऱ्या निवडणुक लाडवण्याची मागणी कार्यकर्त्यांकडून यावेळी माजी जि.प .अध्यक्ष डॉ शिवाजी राऊत यांना केली. या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवाजी राऊत होते. त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना सांगितले आहे की आज पर्यंत आपण सर्वांच्या पाठीमागे एकजुटीने उभे राहून विजय प्राप्त करून दिला आहे. परंतु आपल्या समाजाच्या कुठल्याही अडचणीच्या काळात एकाही नेत्यांनी पाठबळ न दिल्याने सर्व समाजात नाराजी व्यक्त होत आहे . आता वेळ आली आहे मैदानात उतरण्याची. अष्टी मतदार संघाचे नेतृत्व एका खणक्या धनगर व्यक्तीने रखमाजी गावडे पाटील यांनी केले आहे. नंतर काय काळात बीडचे खासदार म्हणून देखील निवडून आलेले आहेत परंतु मागील काही काळात प्रस्थापितांनी आपल्या मतांचा वापर करून स्वतःची पोळी भाजून घेतली आहे. त्यामुळे आता समाजाला न्याय दिशा देण्यासाठी येत्या विधानसभेत आपल्याला कंबर कसल्याशिवाय पर्याय राहिला नाही. येणाऱ्या आगामी विधानसभेच्या निवडणुक ची दिशा ठरवण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी कार्यकर्त्यांनी "भावी आमदार तुम्हीच" म्हणून घोषणा दिल्या. सर्व समाज तुमच्या पाठीमागे आहे असे मनोगत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले..


# साबळे कुटुंबातील महिलांवरील हल्ला, लुगडे महाराज व केशव साबळेवर झालेल्या खोट्या ॲट्रॉसिटी विरोधात उतरले हजारो नागरिक

परळी (वार्ताहर) परळी शहरातील जलालपूर भागात साबळे कुटुंबातील पुरुषांसह महिला व लहान मुलावर झालेला भ्याड हल्ला व लुगडे महाराज, राधाकिसन साबळे व केशव साबळे यांच्यावर झालेली खोटी अट्रोसिटी च्या विरोधात हजारो नागरिकांनी रस्त्यावर उतरून परळी पोलीस स्टेशनच्या निरीक्षक यांच्या मार्फत बीडचे पोलीस अधीक्षक व अंबाजोगाईचे पोलीस उपअधीक्षक यांना विशेष चोकशी करून न्याय द्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. व खोट्या गुन्ह्याचा निषेध व्यक्त केला. परळीत मतदारसंघात सातत्याने खोट्या गुन्ह्यांमध्ये खूप वाढ झाली असून सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विविध लोकांवर राजकीय सुडबुद्धीने जाणीवपूर्वक हेतू पुरस्सर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अडकवण्याचा प्रयत्न वारंवार घडत आहे. याचाच एक भाग राजकीय द्वेषापोटी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर झालेली खोटी अट्रोसिटीची घटना घडली त्यावेळेला लुगडे महाराज हे परळी पासून 40 किलोमीटर अंबाजोगाई तालुक्यातील गावात पक्षाच्या वतीने आयोजित शेतकरी संवाद यात्रेत होते याचा सगळा पुराव्यानिशी फुटेज मोबाईल लोकेशन हे पोलिसांना पुरावा म्हणून दिलेले आहे. तरी ही खोटी अट्रोसिटी रद्द करावी व महिलावर झालेला भ्याड हल्ल्याच्या आरोपींना कडक शासन करावे याच्या विरोधात गुरुवार 10 ऑक्टोबर 2024 रोजी परळी शहरातील संभाजीनगर पोलीस स्टेशनवर हजारो नागरिकांनी एकत्र येऊन पोलीस प्रशासनाला निवेदन दिले. या निवेदनाची दखल प्रशासनाने घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अन्यथा यापेक्षाही उग्र स्वरूपाचे आंदोलन लोकशाही मार्गाने करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी यावेळी दिला.तसेच परळी मध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न खूप गंभीर झाला आहे गुंडागर्दी, दादागिरी, दहशत हे सर्व रोखण्यामध्ये प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरला असून पोलीस प्रशासनाला हाताशी धरून या भागातील सत्ताधारी खोटेनाटे गुन्हे दाखल करून सर्व सामान्य नागरिक व राजकीय सामाजिक क्षेत्रातील लोकांना जाणून-बुजून हेतूपूर्वक राजकीय लोकांना वारंवार टारगेट करून गुन्हे दाखल करत आहेत. असे प्रकार तात्काळ थांबवा अशी मागणी याप्रसंगी नागरिकांनी केली असून या वेळी निवेदन देण्यासाठी परळी मतदारसंघातील हजारो नागरिक परळी पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित झाले होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# अंधारे मॅडम उघडा डोळे आणि बघा नीट छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथील महापुरुषांना कुठपर्यंत आपण अंधारात ठेवणार.





बीड प्रतिनिधी बीड शहरातील सर्वात नामांकित असलेले छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या क्रीडांगणाच्या प्राणांगणामध्ये महापुरुषांचे पुतळे नगर प्रशासनाच्या वतीने उभा करण्यात आलेले आहेत या महापुरुषांच्या पुतळ्याच्या ठिकाणी सर्वत्र अंधेरा कायम आहे अशा प्रकारचे चित्र सध्या बीड शहरातील मध्यवर्ती असलेल्या ठिकाण असलेले छत्रपती शाहू महाराज राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक तसेच जीवा महाले अशा महान क्रांतिकारी महापुरुषांचे पुतळे येथे आहेत या पुतळ्याच्या ठिकाणी मात्र अंधार कायम आहे या ठिकाणी लाईटची व्यवस्था नगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेली नाही या ठिकाणी अनेक युगल तरुण-तरुणी येऊन बसतात आणि असशील चाळे करत असल्याचेही काही नागरिकांच्या निदर्शनास आले आहे याच ठिकाणी रोज मॉर्निंग वर्क असो किंवा सायंकाळच्या वेळेला काही बीड शहरातील प्रतिष्ठित असलेले नागरिक तथा भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे साहेब त्यांच्यासमवेत असलेले त्यांचे सहकारी मित्र व्यापारी संघटनेचे वेद पाठक काका यांच्यासह बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक येथे रोज येत असतात त्यांना काही तरुण-तरुणी या ठिकाणी असशील चाळे करताना देखील निदर्शनास आले असल्याचे त्यांनी सांगितले म्हणून या ठिकाणी जर नगरपालिकेच्या वतीने लाईटची व्यवस्था करण्यात आली तर भविष्यात नक्कीच असे असशील चाळे या महापुरुषांच्या समोर तरी होणार नाहीत आणि महापुरुषांच्या या पुतळ्याच्या ठिकाणी सर्वत्र पावित्र्य राखल्या जाईल म्हणून बीड शहरातील तमाम नागरिकांची मागणी आहे की नगरपालिकेने तात्काळ या संबंधित विषयाकडे लक्ष देऊन या ठिकाणी लाईटची व्यवस्था करावी अंधारे मॅडम आपण नगरपालिकेचे सर्वे सर्वा आहेत आपण एकदा संध्याकाळच्या वेळेला या ठिकाणी येऊन एकदा तरी चक्कर मारून बघा नेमके काय चालले आहे तरी नेमके आपल्या राज्यामध्ये म्हणूनच लोक आता म्हणू लागले आहेत की अंधारे मॅडम उघडा डोळे आणि बघा नीट बीड शहराच्या मध्यवर्ती असलेल्या महान क्रांतिकारी असलेल्या महापुरुषांच्या पुतळ्याच्या ठिकाणी सर्व अंधार आहे तिथे उजेड कधी पडणार अशी देखील चर्चा आता नागरिक करत आहेत



सायं.दै.रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब भाई यांची मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळावर अशासकीय सदस्य पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा




आशा स्वंय सविका या मानधनावर काम करत असतात,शैक्षणिक आरोग्य विषयक,स्वच्छता अभिमान अशा शासनाच्या अनेक उपक्रमांची कामे व जनजागृती आशा स्वयं सेविकांना करावी लागते.तुटपुंज्या मानधनावर मानधनावर काम करत असतानाही त्या आपले कर्तव्य चोख बजावत असतात.त्यांचा मान सन्मान व्हावा याच उद्देशाने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कर्तृत्ववान नऊ आशा स्वयं सेविकांचा सत्कार नुकताच शिशु विहार विद्या प्रसारक मंडळ संस्था,बदलापूर गांव येथे संजीवनी पाटील,अर्चना चोपडे,छाया कांबळे,माया निरगुडे,मोनिका गांगुर्डे,कविता मोसेकर,माया कांबळे,अश्विनी बनसोडे,रुपाली कांबळे यांना प्रमुख पाहुण्या शिशु विहार विद्या प्रसारक मंडळ संस्थेच्या अध्यक्षा विद्या साठे

## जीवनात संघर्ष केल्यास यश निश्चित मिळते : मनोहर मोहरे

ता-08 पुणे प्रतिनिधी अपयशाने खचून निराश न होता सतत प्रयत्न व संघर्ष केला पाहीजे. त्यामुळे आपल्याला जीवनात यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन कवी व लेखक मनोहर मोहरे यांनी केले. आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी ( चिं ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत नवरात्र उत्सवानिमित्त ‘मान्यवर आपल्या भेटीला ‘ या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मोहरे यांनी विद्यार्थ्यांना अनेक संघर्षमय कथा सांगून प्रेरित केले . त्याचप्रमाणे स्वतःचा संघर्षमय प्रवासही उलगडून सांगितला.

मोहरे यांनी विद्यार्थ्यांना कथा व कविता निर्मितीचे तंत्र याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले. कथाबीज , योग्य शीर्षक, भाषाशैली , संवाद, घटनांचा क्रम आशय, व समारोप या बाबी प्रामुख्याने कथालेखनासाठी महत्त्वाच्या असतात. त्याचप्रमाणे कविता ही अंत :करणातील वेदनेतून खऱ्या अर्थाने फुलते . परंतू विद्यार्थीदशेत यमक जुळवून चारोळी तयार केल्यास भविष्यात कवितानिर्मितीची आवड निर्माण होऊन दर्जेदार कविता निर्माण होतील असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. यावेळी विद्यार्थी तन्मयतेने ऐकत होत. आम्हीही कथा व कविता निर्मितीचा प्रयत्न करू असे आश्वासन विद्यार्थ्यांनी मोहरे यांना दिले . यावेळी मनोहर मोहरे यांनी त्यांची स्वलिखित पुस्तके शाळेला भेट दिली . याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनकर पाबळे , शिक्षक राजेश दांगट, सविता कडवे , पूजा निपूंगे , विद्यार्थी व पालक उपस्थित होते . मुख्याध्यापक वैशाली गाढवे यांनी स्वागत केले . मोनिका वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले . जयश्री रोकडे यांनी परिचय तर ठकसेन गवारी यांनी आभार मानले .

## मुंबई व उपनगरात परतीच्या पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला



भारतकवितकेमुंबईकांदिवलीपश्चिम. मुंबई व उपनगरात सध्या आक्टोंबर हिट ने दुपारच्या वेळी नागरिक उकाड्याने हैराण होतात.तर सायंकाळी मात्र परतीच्या प्रवासाने त्रस्त होतात.या परतीच्या प्रवासा मुळे मुंबई व उपनगरांमधील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झालेले आढळते.सकाळी कामावर गेलेले चाकरमानी परतीच्या प्रवासाच्या थैमाना मुळे घरी उशिरा पोहचतात. गुरुवार दिनांक १० आक्टोंबर रोजी सायंकाळी ढगात विजेचा प्रचंड कडकडाट होऊन मोठं मोठा आवाज होऊन पाऊस कोसळत होता.फिरते फेरीवाले , दुकानदार यांची या पावसामुळे तारांबळ उडालेली दिसून येत होती.लहान मुले, महिला,व जेष्ठ नागरिक या पावसामुळे घराबाहेर जात नव्हते. कामवर गेलेले चाकरमानी घराच्या ओढीने घराकडे धाव घेत होते. एकंदरीत मुंबई आणि उपनगरात परतीच्या प्रवासाने अक्षरशः धुमाकूळ घालून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत करून टाकले.

## व्यक्त व्हा “चॅरिटेबल ट्रस्ट व शुभा जोशीचा शानदार कार्यक्रम { जागर स्त्रीशक्तीचा} !!

नुकताच पार पडलेल्या, नवदुर्गा उत्सव निमित्ताने, यशवंत नाट्यगृह , जयश्री आणि जयंत साळगांवकर प्रायोगिक रंगमंच येथे, निवडक कवयित्रींच्या निवडक रचनांचा अविष्कार सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिभा सराफ, सुत्रसंचालिका पूजा काळे, प्राची शिंत्रे, शिवानी गोखले, रश्मी करोडे, नीलाक्षी मोहिते, उमा रावते, स्वाती डांबरी मसुरकर या नऊं जणींनी काव्य वाचन जागर केले. या प्रसंगी सभागृह पूर्ण भरुन गेलं होतं. सदर कार्यक्रमास नाट्य अभिनेत्री, सिने अभिनेत्री श्रीमती आशाताई शेलार आवर्जून उपस्थित होत्या.

काव्यप्रेमी रसिकांनी जागर स्त्री शक्तीचा या बहारदार कार्यक्रमाचा परिपूर्ण आस्वाद घेतला. कवयित्रींच्या कविता अर्थपूर्णतेने सादर केल्या गेल्या. प्रत्येक कवयित्रीची कविता संपली की, रसिक आनंदाने टाळ्या वाजवून दाद देत होते. तसेच , आपल्या आपल्या क्षेत्रात शिखर गाठणाऱ्या महिलांचा, संकल्पना व संयोजक नेहा भगत यांनी स्मृती चिन्ह शाल व मोगरा फुलांची माळ देऊन, सत्कार देखील करण्यात आले. सोबत माजी शिक्षण अधिकारी डॉ. जे. आर. केळूसकर, जेष्ठ पत्रकार, समाजसेवक शशिकांत सावंत, साहित्यिक व कवी विलास देवळेकर यांचा नेहा भगत यांनी शाल घालून, यांचाही सत्कार देखील करण्यात आले. साहित्यिका व कवियत्री सौ पुजा काळे यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचलनाने, श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



आज दि. 9/10/2024 रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सन्माननीय सि.पी. राधाकृष्णन साहेब बीडला आले होते, यानिमित्ताने बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी राज्यपाल मार्फत सन्माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुरमुर यांना निवेदन देण्यात आले आहेत, निवेदनात म्हटलें आहे की SC प्रमाणे मुस्लिमांसाठी संरक्षण कायदा करा, २) T.v. चैनलावर होणाऱ्यांना हिंदू-मुस्लिम डिबेट बंद करा, 3) प्रक्षोभक विडीओ टाकणाऱ्यावर कडक कायदे करा असे निवेदन देण्यात आले आहेत, यावेळी खुर्शीद आलम यांच्या सह OBC जिल्हाध्यक्ष शेख जाकेर भाई, हकीम भाई मन्यार,रफु सेठ, मोहम्मद शहेबाज वगैरे दिसत आहेत,

## आ.लक्ष्मण पवार यांच्याझाकली मुठ...भूमीकेने गेवराई मतदार संघात संभ्रम कायम भुमीका स्पष्ट नसतानीही कार्यकर्त्यांनी सोशल मिडीयावर तुतारी वाजवली

उमापूर / प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या पश्चीम टोकाकडील गेवराई विधानसभा मतदार संघाचे भाजपाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी विकास कामाबाबतीत पालकमंत्र्यांकडून अडवणुक होत असल्याची जाहिर नाराजी व्यक्त करून महिना उलटत असतानाही अद्याप पर्यंत ठाम भूमिका घेतलेली नाही.शरद पवार कि भाजपा कुणाबरोबर आहे, हे त्यांनी स्पष्ट न करता ‘झाकली मुठ....’ ठेवल्याने गेवराई तालुक्यातील राजकारणात सध्या संभ्रम आहे. एवढेच नाही, तर त्यामुळे काय पवित्रा घ्यायचा यामुळे लक्ष्मण पवार यांचे प्रतिस्पर्धीही गोंधळलेले आहेत तर लक्ष्मण पवार यांच्या कार्यकर्त्यांकडून मात्र सोशल मिडीयावर मात्र त्यांच्या कार्यकर्त्यांनी ‘गेवराई तुतारी वाजणार आणि उमेदवार पण लक्ष्मण आण्णाच उमेदवार असणार बरं का’ अशा आशयाचे पोस्ट व्हायरल केले आहे.

आमदार लक्ष्मण पवार यांनी मुंबई स्थित शरद पवार यांच्या उपस्थितीतील कार्यक्रमाला माजी मंत्री राजेश टोपे यांच्या सोबत हजेरी लावल्याने तालुक्यात लक्ष्मण पवार हे १० तारखेला शरद पवार यांच्या



गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरु होती मात्र लक्ष्मण पवार यांनी बुधवारी फेसबूक पोस्ट करून ‘राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षा मध्ये 10 ऑक्टोबरला प्रवेश करणार अशा काही बातम्या वर्तमानपत्रांमध्ये आल्या असून त्या बातम्या ला तथ्य न धरता कुणीही उद्या मुंबईला जाऊ नये ,मी मुंबई मध्ये नाही’ अशी पोस्ट केल्याने आमदार पवार नक्की कोणासोबत हा संभ्रम आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे आ.पवार याबाबत थेट भूमिका स्पष्ट करीत नसल्याने या संभ्रमात आणखीच भर पडत चालली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर माजी आ.अमरसिंह पंडीत यांनी लगेचच भूमिका स्पष्ट करून अजित पवार यांच्यासमवेत जाण्याचा निर्णय घेतला. तर माजी मंत्री बदामराव पंडीत यांनी शिवसेनेतच बस्तान बसवले त्यातच राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवार यांनी बदामरावांच्या घरी भेट देवुन त्यांच्या कार्यकर्त्यांना आश्वस्त केले होते यामुळे महाविकास आघाडीचे तीकीट बदामराव पंडीत यांनाच मीळेल अशी आशा त्यांचे कार्यकर्ते बाळगुन आहेत.

## आ.लक्ष्मण आण्णांच्या नेतृत्वात मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध - शिवराज पवार

### शिवराज पवारांच्या हास्ते २५ कोटी रुपये निधीच्या रस्ता कांमाचे आज उद्घाटन संपन्न

गेवराई: मतदारसंघातील जनतेने बाळराजे पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई मतदारसंघातील रस्त्याच्या माध्यमातून जनतेचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावत मतदारसंघात जलसिंचन व्हावे म्हणून आ.लक्ष्मण पवार यांनी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक गावांत असलेल्या नद्यांवर खोलीकरण, रुदीकरण,करत अनेक दर्जेदार सिमेंट बंधारे उभारून अनेक गावांना पाणीदार करण्यासाठीच पारदर्शक काम केले आहे,

गेवराई मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनेक 33 केव्ही केंद्राची उभारून ग्रामीण भागातील अनेक गावांचा अंधार दूर करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले आहे

मतदारसंघात आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ.लक्ष्मण पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन मोठ्या प्रमाणात विकास कामे सध्या मतदारसंघात सुरुच आहे आण्णांच्या नेतृत्वाखालील मतदारसंघातील सर्वागिण विकासाठी आम्ही कटिबद्ध .त्या अनुषंगानेच मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील राममा 61 ते हारकी निमगाव,रामपिंपळगाव,मगरुळ 2, 6 की.मी. किंमत 6 कोटी,तालखेड फाटा ते तालखेड रस्ता 5 की.मी. किमंत 5 कोटी,माजलगाव रोड ते जाभंळी तांडा,4.500 कि.मी. किंमत 2 कोटी70 लक्ष,



मतदारसंघातील बीड तालुक्यातील पेडगाव फाटा ते कांबी, सौदाना रस्ता,9.750 क.मी.किंमत 7 कोटी 27 लक्ष गेवराई तालुक्यातील भेड खु.ते.भेड बु.रस्ता 4 की.मी.किंमत 3 कोटी,केकत पागंरी ते हारीलाल नाईक तांडा, 3 कि.मी.2 कोटी रुपयाचे आज दि.10 ऑक्टोबर रोजी युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ संपन्न झाला


यावेळी अभियंता कुलकर्णी, तालुका प्रमुख शिनुभाऊ बेद्रे,शरद कचरे,वैभव मोरे,अभिजीत मोरे,संतोष जाधव, कृष्णा उडे,विठ्ठल मोरे,अभिजीत जाधव,संतोष गायकवाड, भरत गायकवाड, किशोर धोडलकर, समाधान मस्के,करण जाधव, गोरख मोटे,कृष्णा पाटोळे,बाबा वाघमारे,गणेश पवार, भाग्योदय पटेकर,दिपक शेलार,बाबु खराडे,रवि जगले,रंगनाथ कोळपे,मधुकर सौळुके,राजाभाऊ शिदे,किसान वाव्हळ, पप्पु पांचाळ,गुत्तेदार दागंट,मनोज फाटक,सुनिल कराडे,शुभम माऊली आदी उपस्थित होते,

## सौ . विजया शिंदे कल्याणकर यांचा सत्कार !

नुकताच पार पडलेल्या यशवंतराव चव्हाण सेंटर मध्ये, सौ विजया शिंदे कल्याणकर यांचा ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मानाने सन्मानीत करण्यात आले. राणी लक्ष्मीबाई उद्यान ज्येष्ठ नागरिक मंडळात त्या सचिव पदावर कार्यरत आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर, त्यांनी समाज कार्यात स्वतःला झोकून दिले. ज्येष्ठ नागरिक मंडळात, अनेक उपक्रम चालू केले .ज्येष्ठाना आनंद मिळण्यासाठी, अध्यात्मिक वाचन , एकदिवसीय सहल, बौद्धिक परीक्षा, हळदी कुंकू, मंगळागौर, दिवाळी पहाट, वाढदिवस, आणि गायन. असे अनेक प्रोत्साहन देणारे उपक्रम राबवले. यामुळे उत्साह ,आनंद ज्येष्ठ नागरिकांत दिसू लागला. सरकारी योजना, आरोग्य तपासणी, योगा याबाबत, मंडळात चर्चा करतात. वृद्धाश्रम, अनाथाश्रम येथे जातात. गरजूंना मदतीचा हात देतात. विद्यार्थ्यांशी संवाद करतात. कविता कथाकथन, भजन याचा देखील छंद त्यानी जोपासला आहे . यांच्या कार्याची दखल घेऊन, आनंद मेळावा रौप्य महोत्सव वर्षात, त्यांना सन्मानित केले आहे. रोख रक्कम, सन्मान चिन्ह व मानपत्र देऊन सेवानिवृत्त न्यायाधीश धर्माधिकारी यांचे हस्ते त्यांना सन्मानीत केले. फेस्कॉम अध्यक्ष मा.शा.गो. पाटील, मा.टेकाळे, माजी महापौर ॲड. निर्मला सामंत, सेंटरच्या सीईओ दिप्ती नाखले, विजय कान्हेकर, ॲड. प्रमोद ढोकळे, दिपिका शेरखाने आदी मान्यवर उपस्थित होते .

सौ विजया भानुदास शिंदे यांचे शिक्षण एम.ए अर्थशास्त्र मंत्रालयातून अधिकारी म्हणून निवृत्त झाले आहेत. समाजकार्यात देखील, सतत हिरिरीने भाग घेत असतात . मराठा सेवा प्रतिष्ठान या संघटनेवर प्रदेश उपाध्यक्षा म्हणून परदेशी दौरे केलेले आहेत. सामाजिक संस्था इ. सर्वच क्षेत्रांत, त्या भाग घेत असतात. कल्याणकर असलेल्या, सौ विजया शिंदे यांचेवर साहित्याच्या माध्यमातून, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, कार्यरत असल्याने, त्यांच्या वर साहित्य क्षेत्रातून, तसेच कल्याणकर साहित्य प्रेमींया कडून, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# परळीत धनंजय मुंडे यांना कोण देणार आव्हान, कोणाच्या नावाची चर्चा?

महाराष्ट्रातील अनेक असे मतदारसंघ आहेत जे नेत्यांची खास ओळख बनले आहेत. महाराष्ट्रात अनेक दिग्गज नेते एकाच मतदारसंघातून अनेकवेळी निवडून विधानसभेवर आले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे परळी विधानसभा मतदारसंघ. या मतदारसंघातून भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी निवडणूक लढवली होती. त्यांच्यामुळे परळी विधानसभेची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला झाली. २००९ साली गोपीनाथ मुंडे हे लोकसभेवर निवडून गेले. त्यामुळे या मतदारसंघातून त्यांची मुलगी पंकजा मुंडे यांनी विधानसभा निवडणूक लढवली. दोन वेळा आमदार झाल्यानंतर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा धनंजय मुंडे यांनी पराभव केला. धनंजय मुंडे आता अजित




पवार गटात आहेत. पकंजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यात कांटे की टक्कर झाली. दोघांमधील संबंध काही काळ बिघडले होते. पण आता अजित पवार हे महायुतीत आल्याने त्यांच्यातील वितुष्टही संपले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे पुन्हा एकदा याच मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. लोकसभेचं तिकीट दिल्याने त्यांना विधानसभेचं तिकीट मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे या निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्यासमोर पंकजा मुंडे यांचं आव्हान नसणार आहे. मागच्या निवडणुकीत बजरंग सोनावणे यांच्या ऐवजी राष्ट्रवादीने धनंजय मुंडे यांनी तिकीट दिले होते. धनंजय मुंडे यांनी ती निवडणूक जिंकवून दाखवली होती. पण आता ते अजित पवार गटात गेल्याने आणि बजरंग सोनावणे हे खासदार झाल्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून नव्या चेहऱ्याला संधी मिळू शकते. निवडून आलेले लोकप्रतिनिधी (रेणापूर विधानसभा मतदारसंघ) 1962 – गणपती आण्णा 1967 – ए.जी. गित्ते 1972 – रघूनाथ मुंडे 1978 – रघूनाथ मुंडे 1980 – गोपीनाथ मुंडे 1985 – पंडितराव दौंड 1990 – गोपीनाथ मुंडे 1995 – गोपीनाथ मुंडे 1999 – गोपीनाथ मुंडे 2004 – गोपीनाथ मुंडे (परळी विधानसभा मतदारसंघ) 2009 – पंकजा मुंडे 2014 – पंकजा मुंडे 2019 – धनंजय मुंडे

## मनोज जरांगे फॅक्टर

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरु केले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी सरकारला कोंडीत पकडले आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले नाही तर सगळ्या जागा पाडणार असा इशारा त्यांनी दिला होता. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पराभवाचा सामना करावा लागला. लोकसभेत पंकजा मुंडे यांचा बजरंग सोनवणे यांनी पराभव केला. आता जर विधानसभा निवडणुकीतही ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष झाला तर वंजारी मतांमध्ये फूट पडू शकते. यांचा मोठा फटका धनंजय मुंडे यांना बसू शकतो. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे एकत्र असल्याने या मतदारसंघात मुंडे यांची ताकद वाढली आहे. महायुतीकडून धनंजय मुंडे यांनाच तिकीट मिळणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे त्यांचं पारडं जड आहे. महायुतीचा इथे दुसरा कोणता उमेदवार इच्छूक नाही. त्यामुळे त्याचा ही फटका महायुतीला बसण्याची शक्यता नाही. महाविकासआघाडीच्या उमेदवाराला धनंजय मुंडे सारखा तगडा उमेदवाराला पाडण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे.

# दिव्यात चिमुरडीवर अत्याचार प्रकरणी आरोपीला पुन्हा ७ वर्षाची शिक्षा.

संतोष पडवळ - प्रतिनिधी ठाणे, दिवा ता १० ऑक्टो : मुंब्रा पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर 1144/2021 भ द वि 363, 354, 342, 506 सह पोस्को कलम 8,12 प्रमाणे ठाणे न्यायालय विशेष केस 57/2022 नुसार गणेश बाळाराम पाटील वय 41 वर्ष रा. साबेगाव, दिवा, ठाणे यास दुसऱ्यांदा ७ वर्षाची सजा लागली आहे. सविस्तर पीडित मुलगी वय 11 वर्ष ही साबेगाव दिवा येथे शाळेसमोर




खेळत असतांना नवीन बिल्डिंगचे बांधकाम चालू असलेल्या जागेकडे घेऊन गेला व तिच्यावर आरोपीने पीडितेचा बालपणाच्या गैरफायदा घेऊन लैंगिक अत्याचार केला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशेष म्हणजे ह्या आरोपीने 2009 मध्ये 8 वर्षाच्या मुलीसोबत अश्याच प्रकारचा अत्याचार करून गुन्हा केला होता त्या गुन्ह्यात सुद्धा 7 वर्ष कारावासाची शिक्षा झाली असताना शिक्षा भोगून बाहेर आल्यावर काही वर्षांनी 2021 मध्ये परत लैंगिक गुन्हा केला आहे त्यामध्ये ही माननीय न्यायालयाने दोषी ठरवून ७ वर्षाचा सश्रम कारावास व 10,000 रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे न्यायाधीश मा. दिनेश देशमुख जिल्हा न्यायाधीश (पोक्सो) अंतर्गत सरकारी अभियोकता संध्या म्हात्रे तपासी अधिकारी PSI शितल पाटील तसेच पोलिस हवालदार 6892 विद्यासागर कोळी यांनी कामकाज पाहिले.

# कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या संघटनेची करारनाम्याची हॅट्रिक !



एकाच दिवसात तिन कंपन्यांतील कामगारांसाठी पगारवाढीचे करार रायगड व नवीमुंबई मधील कामगारांना न्याय देणारी कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वातील न्यू मॅरीटाईम अँन्ड जनरल कामगार संघटना हि एकमेव संघटना होय. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करणारे कामगार नेते हे आपल्या नेतृत्व कौशल्याने गेली ३७ वर्ष कामगारांना न्याय देत आहेत. आज शेलघर येथील कार्यालयात तीन कंपन्यांतील कामगारांच्या पगारवाढीचे करार करण्यात आले. मे. सुरज अॅग्रो इन्फ्रा. प्रा. ली.जे. एन. पी. टी उरण या कंपनीतील कामगारांसाठी तीन वर्षासाठी १६००० रुपये पगारवाढ करण्यात आली. त्याचबरोबर एक बेसिक पगार कामगारांच्या परिवारासाठी मेडिक्लेम पॉलीसीसाठी तसेच १४% बोनस देण्याचे मान्य करण्यात आहे आहे. तर तळोजा येथील सवेरा इंडिया रायडींग सिस्टीम या कंपनीतील कामगारांसाठी ९२०० रुपयंची पगारवाढ, ३ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलीसी व एक ग्रॉस पगार बोनस, 10 लाख रुपयांची टर्म इन्शुरन्स देण्याचे मान्य करण्यात आले. तिसरा करारनामा मे. किम केमिकल्स या कंपनीतील कामगारांच्या पगारवाढीसाठी करण्यात आला. या करारनाम्यानुसार काममारांना तीन वर्षासाठी 6500 रुपये पगारवाढ तसेच एक ग्रॉस सॅलरी + 5000 प्रत्येकी बोनस देण्याचे मान्य करण्यात आले. यावेळी न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते श्री. महेंद्रशेठ घरत, कार्याध्यक्ष श्री. पी. के. रामण,सरचिटणीस श्री. वैभव पाटील उपस्थित होते. तर सुरज अॅग्रो कंपनीतर्फे बिझनेस हेड श्री. जयेश चौहान, जि. एम. ऑपरेशन श्री. सुशील कुराळे तसेच कामगार प्रतिनिधी अरुण पाटील, राकेश म्हात्रे, सौकत अली, किशोर पाटील आदि उपस्थित होते. सवेरा इंडिया तळोजा या कंपनीतर्फे ऑपरेशन मॅनेजर श्री. अजय पवार तर कामगार प्रतिनिधी संदीप म्हात्रे,रविंद्र जंगम, भरत बोडका, सुभाष तांडेल, हरी पाटील, आत्माराम पाटील, रोशन भोईर, विनोद बारसे, महेंद्र म्हात्रे, रामलाल पासवान आदि उपस्थित होते. किम केमिकल्स तळोजा कंपनीतर्फे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. महेश चंदानी व कामगारांतर्फे सुनील पाटील, विश्वास भोईर,श्रीनाथ मढवी , सुभाष म्हात्रे आदि उपस्थित होते. एकाच दिवसात तीन कंपन्यांतील कामगारांसाठी पगारवाढ करणारी न्यू मॅरीटाईम अॅन्ड जनरल कामगार संघटना हि रायगड, नवीमुंबईतील एकमेव कामगार संघटना आहे.

# खासगी ठेकेदाराला चक्क सहा तास वीज परमिट;-जरंडी उपकेंद्र सहा तास बंद

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे) सोयगाव तालुक्यातील जरंडी वीज उपकेंद्रातुन चक्क खासगी ठेकेदाराला सहा तास विजेची परमिट दिल्या ने गुरुवारी सकाळी अकरा वाजेपासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत जरंडी गावाचा गाव व शेती वीज पंप चा वीजपुरवठा ठप्प झाला होता त्यामुळे वीज ग्राहक हतबल झाले होते

जरंडी वीज उपकेंद्रातून पंधरा गावांना वीज पुरवठा करण्यात येतो परंतु खासगी ठेकेदाराला विजचे काम करण्यासाठी चक्क गुरुवारी सहा तास परमिट दिल्या मुळे जरंडी वीज उपकेंद्रचा वीज




पुरवठा भरदिवसा ठप्प झाला होता कृषी पंप सह गाव पुरवठा चे फिडर बंद करून परमिट देण्यात आले त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थ हतबल झाले दरम्यान या खासगी ठेकेदाराला महावितरण च्या कोणत्या अधिकाऱ्यांनी हे परमिट दिले असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान या प्रकरणी सोयगाव चे कनिष्ठ अभियंता पठाण यांचेशी संपर्क साधला असता त्यांचा फोन लागला नव्हता जरंडी चे लाईनमन विकास पाटील यांचेशी संपर्क साधला असता त्या ठेकेदाराने वरीष्ठ पातळी वरून परमिट चे आदेश आणले असल्याचे सांगितले त्यामुळे त्यांना हे परमिट देण्यात आले असे सांगितले मात्र महावितरण च्या वीज मंडळाने ऐन नवरात्र मध्ये सणा सुदीच्या काळात ग्रामस्थांना वेठीस धरले वीज पुरवठा ठप्प झाल्या मुळे बँकेचे व्यवहार ठप्प झाले होते त्यामुळे बँकेच्या खातेदारांना व्यवहार करता आले नाही.

# आष्टी तालुक्यात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शाखांचे जल्लोषात उद्धाटन संपन्न...... शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक निर्माण करून हिंदूहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे असे प्रतिपादन जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी विविध गावांच्या शाखा उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.... शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे साहेब, शिवसेना नेते विनायकरावजी राऊत साहेब, आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज आष्टी विधानसभेतील धानोरा, सोलापूरवाडी, वाघळुज येथे माझ्या हस्ते शिवसेना शाखा उद्धाटनाचा झंझावात कार्यक्रम मोठ्या आनंदात पार पडला. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की सध्या या सरकारच्या विरोधात सामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष आहे... महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगार, शेतकरी आत्महत्या असे अनेक प्रश्न निर्माण झालेले असताना या सरकारमधील मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री व यांचे मंत्री मंडळातील मंत्री फक्त टक्केवारी घेण्यात व भ्रष्ट पद्धतीने पैसा जमा करण्यात व्यस्त आहेत, सत्ताधारी पक्षातील अनेक मंत्री बेताल वक्तव्य करत आहेत यांना सत्तेचा माज चढलेला आहे यांचा हा नंगानाच सामान्य जनता आपल्या डोळ्याने बघत आहे,जनता या भस्मासूर रूपी सरकारला कंटाळली असुन येणाऱ्या निवडणुकीत या रावणरूपी सरकारचे दहन करून...... या राज्याला स्थीर सरकार देण्यासाठी व शेतकरी कष्टकरी यांना समृध्द बनवण्यासाठी एक नवमहाराष्ट्र निर्माण करण्यासाठी या राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार व पुन्हा एकदा शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या रूपाने विधानभवनावर भगवा फडकावून उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पाहण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आवाहन केले.. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख म्हणून शिवसैनीकांच्या खंबीरपणे पाठीशी उभा राहणार असेही प्रतिपादन केले ज्या ज्या गावात शिवसेनेच्या शाखा निर्माण केल्या त्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांचे शिवसेना पक्षात स्वागत केले... यात्प्रसंगी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत, शिवसेना शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे,वाघळुज येथील सरपंच अजयजी गुंड, युवासेना उपजिल्हाप्रमुख अभिषेक दिवे यांची समायोचित भाषणे झाली.... याप्रसंगी विधानसभा प्रमुख नवनाथ अटूळे,उपतालुकाप्रमुख संदीप हाडे,उपतालुकाप्रमुख दादा लगड, शहर प्रमुख महेश एकशिंगे,तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे, युवा सेनेचे तालुका प्रमुख शिवप्रसाद जाधव, ऋषी भैय्या गिरी,हरि मावसकर,गटप्रमुख रामदास मोहिते,गटप्रमुख शिवाजी थोरवे,गटप्रमुख सोमनाथ खिळे,गटप्रमुख बापूराव काळे, सोशल मीडिया तालुका प्रमुख साईराज पाखरे, शाखा प्रमुख बबन तरटे, शाखा प्रमुख तुकाराम थोरवे, शाखा प्रमुख आकाश पिंगळे सह सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com